<u>आरोपीचे प्रतिकथन</u>

<u>सक्षिप्त फौजदारी खटला क्र.६०५७/२०२६</u>

निशाणी क्र.०३

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याचा दिनांक | : - १६/१२/२०२५ |
| २. | फिर्याद दाखल करण्याचा दिनांक | : - १६/१२/२०२५ |
| ३. | फिर्यादीचे नाव | : - महाराष्ट्र शासन |
| ४. | आरोपीचे नाव | : - शिवकुमार ब्रिजकिशोर सिन्दोलिया, वय-५७वर्ष<br>रा.प्लॉट नं.१८ जोशीवाडा , पार्वती नगर,<br>जि.नागपूर |

५. <u>आरोपीस स्पष्ट केलेला गुन्हयाचा तपशील</u> : -

दिनांक १६/१२/२०२६ रोजी १६.४५ वाजन्याच्या सुमारास नागपूर येथील वंजारीनगर येथील पाण्याच्या टाकीजवळ तुम्ही कच्चा चिवडाचे हातठेल्याचे दुकान रत्यावर लावुन तेथील सार्वजनिक रत्यावरील वाहतुकिस अडथळा निर्माण केल्याचे पोलीसांना मिळून आला व त्यामुळे तुम्ही भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८५ प्रमाणे गुन्हा केल्याचा तुमच्यावर दोषारोप ठेवण्यात आला.

दि. ०९.०५.२०२६ (एम.के.पाटील)

नागपूर. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी नागपूर

६. <u>आरोपीचे प्रतिकथन : -</u>

प्रश्न १ :- तुम्हाला पोलिस पेपर्सच्या नकला मिळाल्या का ?

उत्तर :- होय

प्रश्न २ :- तुम्हास तुमचेवर ठेवलेला आरोप वाचून व समजावून सांगितला तो समजला काय ?

उत्तर :- होय

प्रश्न ३ :- तुम्हाला सरकारकडून वकील पाहिजे आहे का ?

उत्तर :- नाही

प्रश्न ४ :- तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर :- मला गुन्हा कबुल नाही

----------------

(आरोपीची सही/अंगठा) समक्ष

( एम. के. पाटील )

दि.०९-०५-२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर

समरी फौजदारी खटला क्र.६०५७/२०२६
निशाणी क्र.०१
सिएनआर नं.एमएचएनजी-०३००६८२६२०२६

आदेश नि.०१ वर

प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपी- शिवकुमार ब्रिजकिशोर सिन्दोलिया यांचे विरुध्द भारतीय न्यायसंहिता २०२३ चे कलम २८५ प्रमाणे दोषारोप पत्र दाखल करण्यात आला आहे. आज रोजी आरोपी हे प्रस्तुत खटल्यात हजर झाले आहेत व त्यांचे प्रतिकथन हे नि. ०३ वर नोंदवण्यात आले व त्यामध्ये आरोपीने त्यांचे स्वइच्छेने गुन्हा कबुल केला. तसेच, आरोपी यांनी प्रस्तुत खटल्यातील गुन्हा त्यांनी केल्याचे त्यांना कबुल असलेबाबतची पुरसीस नि.०२ वर दाखल केली आहे व त्यामध्ये देखील त्यांनी प्रस्तुत खटल्यातील गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. त्यामुळे या न्यायालयाने आरोपी यांनी त्यांचे स्वइच्छेने व कोणतेही दबावाखाली न येता गुन्हा कबुल केल्याचे खात्री केली. त्यामुळे आरोपीने केलेली गुन्हा कबुली ही स्वीकारणे योग्य आहे. त्यामुळे आरोपीस भारतीय न्यायसंहिता २०२३ चे कलम २८५प्रमाणे दोषी धरुन शिक्षा देणे आवश्यक आहे. आरोपी यांनी त्याचे आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्याचे व त्यास कमीत कमी दंडावर सोडण्यात यावे अशी विनंती केली. त्यामुळे प्रस्तुत खटल्यातील गुन्हाचे स्वरुप विचारात घेता आरोपीस प्रस्तुत खटल्यातील गुन्हायासाठी योग्य त्या दंडाची शिक्षा देणे आवश्यक आहे. त्यामुळे हे न्यायालय खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे-

आदेश

१. आरोपी शिवकुमार ब्रिजकिशोर सिन्दोलिया यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७८ (२) प्रमाणे भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८५ चे गुन्हायासाठी दोषी धरण्यात आले व त्यास दंड रक्कम रु.५००/- करण्यात आला व त्यांनी सदरील दंडाची रक्कम जमा न केल्यास २ दिवस साधा कारावासाची शिक्षा भोगावी.
२. आरोपी याचे जामीन व बंध पत्र हे रदद करण्यात आले.
३. प्रस्तुतचा खटला निकाली काढण्यात आला.

MAHESH KRISHNA PATIL
Digitally signed by MAHESH KRISHNA PATIL
Date: 2026.05.09 15:27:22 +0530

दि. ०९.०५.२०२६ (एम.के.पाटील)

नागपूर. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी नागपूर

पॅनल हेड (पेट्टी केसेस)